**Indian Streams Research Journal**
**Vol -1 , ISSUE –1, Feb - 2011**
**ISSN:-** 2230-7850 Available online at www.isrj.org

ORIGINAL ARTICLE

# स्त्रीभ्रूण हत्या – समाजातील धगधगते वास्तव

***सौ. चंदा मंगेश खंडारे***

सहा. प्राध्यापक , गृहअर्थशास्त्र विभाग,श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर.

***प्रस्तावना***

स्त्री भृणहत्येसारख्या निंद्य व लांच्छनास्पद प्रकाराने आपल्या सामाजातील सुसंस्कारीतपण जणु नष्ट झाला आहे असे केव्हाच वाटायला लागले. मुळातच हा प्रकार 100 टक्के केवळ डॉक्टरामुळेच होतो. कारण प्रसुतीपूर्व गर्भनिदान करणे कोणलाही शक्य नाही. गरोदरपणीच्या तपासण्या आणि जन्मजात गर्भाला काही व्याधी असेल तर त्यावर उपाययोजना याकरीता ज्या तंत्रज्ञानाचा शोध लागला त्यामुळे संपूर्ण मानवजातीची मान उंचावली होती. परंतु तीच मान आता गर्भनिदान करून एका स्त्री जातीचा गर्भ नष्ट करण्याकरिता तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. त्यामुळे मान किती खाली झुकली आहे याची कल्पनाही करवत नाही.

मानव रानटी अवस्थेत असतांना जेव्हा टोळ्याटोळ्यांनी वावरायचा, तेव्हा टोळीची ताकद केवळ टोळीतील सदस्य संख्येवर अवलंबून असायची. ही संख्या जास्तीत जास्त वाढविण्यासाठी अनेक स्त्रियांची गरज त्यांना भासायची, म्हणून इतर टोळ्यांना हरवून त्यांच्या स्त्रियांना बंदी बनवून पुनरूत्पादनासाठी जबरदस्तीने वापरणे याकडे नेत्या टोळीचा कल असायाचा. नंतर मग हारलेल्या टोळीतील पुरूषमंडळीना हिणविण्यासाठी त्याचा उपयोग व्हायचा.

कालांतराने मानवाने भटकेगीरी सोडून वस्ती करण्यास सुरूवात केली. पण स्त्रीयांचा शारिरीक क्षमता व शरीरशास्त्रीय मर्यादा इत्यादीमुळे त्यांना अंगमेहनतीची कामे पुरूषप्रमाणे शक्य नसते म्हणून घरकामे व बालसंगोपण यामध्ये अडकून पडावे लागले. पण यावेळीही त्यांना पळवून नेले जाई. म्हणून इतरांच्या नजरेस ती पडणार नाही याकरीता तिला बुरखा, घुंगट, डोक्यावरून पदर यासारख्या रूढी पडल्या.

स्त्री पुरूष समानतेच्या पुरस्कार सगळ्या पातळीवर होत असला तरी वस्तुस्थिती मात्र खुप वेगळी आहे. सामाजीक, राजकिय, आर्थिक व शैक्षणिक सवेच क्षेत्रामध्ये स्त्रीच्या प्रमाणांचा निर्देशांक डळमळीत होऊ लागला. स्त्रीभृण हत्या ही आपल्या समाजाला लागलेली कीड आहे. मुलामुळे वंश चालतो ह्या परंपरेने चालत आलेला समज वर्षानुवर्ष आपण जपतो आहोत.

2001 सालच्या तुलनेत 2011 साली लोकसंख्या 17.64 ने वाढली. आजच्या घडीला सर्व भारतीय सव्वासे कोटी च्या घरात आहेत. असे असल तरी देशभरात मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या 940 इतकी आहे. तर महाराष्ट्रात दर हतार मुलामागे 925 मुली आहेत. वंशासाठी दिवा हवा, पणती नको या हट्टापायी समाजातील मुलींचे प्रमाण कमी होत गेले.

**स्त्रीभृण :–**

मातेच्या गर्भाशयात वाढणारा गर्भ स्त्रीलिंगी असल्यास त्यास स्त्रीभृण संबोधल्या जाते.

भारतामध्ये स्त्रीची ओळख एक बुध्दीमान, मेहनती, व्यासंगी, प्रबळ ईच्छाशक्ती असणारी आहे. आज ती अनेक क्षेत्रांमध्ये यशस्वी भूमीका निभावतांना दिसते. तरीसुध्दा ताज्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार पुढारलेल्या महाराष्ट्रात पुरूषांच्या तुलनेत महिलांचे घसरलेले प्रमाण चिंताजनक आहे.

लेकीचा ग जनम। गाड्याचा बईल
कधी इसावा होईल । देवा ठावं
लेकीचा ग जगम । देव देऊनी चुकला
बेल घण्याला बांधला। जलमभरी

या ओळीतून भारतीय स्त्रीची दुरावस्था लक्षात येते. हिच मानसीकता आज समाजात बघायला मिळते. त्यामुळे मुलीचा जन्म कुटूंबात नको असाच हट्टाहास दिसून येतो. हे चित्र पाहता स्त्रीभृण हत्या हा एक चिंतनाचा विषय असून या विषयावर अध्ययन करण्याची गरज निर्माण झाली.

या अध्ययनाकरीता खालील उद्दीष्टे घेतली आहेत –

**अभ्यासाची उद्दीश्टये –**

- मुलींच्या घटत्या प्रमाणाच्या कारणांचा शोध घेणे.
- भृणहत्येमुळे स्त्रीच्या स्वास्थावर होणारा परिणाम अभ्यासणे.
- त्यावरील उपाययोजनाचा शोध घेणे.

विविध जाती धर्माचा विचार केल्यास स्त्रिछळवादाचा इतिहासाचा मागोवा घेताना पुर्वीपासूनच संपत्ती म्हणून एक भोग वस्तुचे दुय्यम स्थान तिला मिळाले. राज्यस्थानात तर तिला अमानुशपणे दुधात जहर टाकून किंवा काचेची भुकटी टाकून संपवले जाई. एवढेच काय कमी झाले म्हणून सतीप्रथा, हुंडापध्दती, आर्थीक, शैक्षणिक मानसिक व शारिरीक पोषण त्याच्या जोडीला असायचेचे. क्षणोक्षणी स्त्रियांचे शोषण गळचेपी करण्याचा प्रयत्न होत आहे. आज जन्मण्यापासून तर मृत्यूपर्यंत तिला सतत संघर्ष करावा लागत आहे. महाराष्ट्र हे पुढारलेले राज्य समजले जात असुनही जन्मण्यापूर्वी मुलींची हत्या करण्याचे प्रमाण येथेच अधिक आहे. याच महाराष्ट्रात अलिकडच्या अहवालानुसार दर हजारी 78 मुली नहीशा होत आहे.

**कन्याजन्माचे प्रमाण कमी असण्याचे कारणे –**

- मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी ही मानसीकता.
- सोनोग्राफी सेंटरचे वाढते प्रमाण.
- लिंग परिक्षणाने स्त्रीभृणहत्या.
- भृण लिंग परिक्षण विरोधी कायद्यातील त्रुटी.
- स्त्रीयांमध्ये लैंगीक शिक्षण व आरोग्य शिक्षणाचा अभाव.
- प्रसार माध्यमांची भूमिका.
- जनजागृतीचा अभाव.
- हुंडा पध्दती.
- स्त्रीअस्तीत्वाला दुय्यम स्थान.
- स्त्रीयांचे आर्थीक परावलंबीच.

**स्त्रीभृणहत्या रोखण्याची उपाययोजना –**

- सर्वप्रथम समाजाची रूढीवादी संकुचित मानसीकता बदलणे आवश्यक आहे.
- सामाजिक चेतना व जनजागृती, अंधश्रध्दा निर्मुलन.
- गुन्हेगारास कठोर शासन.
- जुन्या प्रथा परंपराना तिलांजली व समाज जागृती.
- प्रसार माध्यम रेडिओ, टि. व्ही. पोस्टर्स जाहीरातीद्वारे उद्बोधन.
- स्त्रीयांमध्ये आत्मनिर्भरता व स्वावलंबन.
- डॉक्टर्स, सामाजीक संस्था द्वारे व्याख्याने कार्यशाळांच्या माध्यमातून जाणीव जागृती स्त्रियांना समान संधी.
- गर्भनिदान प्रतिबंध कायद्याची अंमलबजावणी
- वैद्यकिय क्षेत्राचे भरीव मोलाचे योगदान.
- स्त्रियांना संरक्षण देणारे भारतीय दंडविधानातील कार्य दृष्टीक्षेपात आणणे.
- हुंडापध्दती सारख्या अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी कठोर कायदे असावेत.

नका करू अट्टहास, कन्येलाच माना पुत्र आज
वंशाचा दिवा कल्पना बदलून मन करा विशाल
कर्तबगार कन्या करते, वंशाची तुमच्या मशाल
ज्ञानरूपी अंजनाची घालुनिया वात
समाजपरिवर्तनाला आज करू या सुरूवात.

**गर्भपाताचा स्त्रीच्या स्वास्थावर होणारा परिणाम –**

(डॉ. गुप्ता मंजु – 2009) यांचे मते महिलांनी एक वेळा किंवा अनेक वेळा गर्भपात केला असेल तर त्यांच्या स्वास्थावर अनिष्ठ परिणाम होतांना दिसून येतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार गर्भभातामुळे काही स्त्रीला रक्तक्षय होण्याचा धोका असतो. तसेच एकापेक्षा जास्त वेळा गर्भपात झाला असेल तर एनिमिया होण्याची दाट शक्यता असते. रक्ताच्या कमतरतेमुळे स्त्री कमजोर होते. त्यामुळे संसर्गजन्य रोगाना प्रतिकार करण्याची शक्ती कमी झाल्यामुळे शरीरस्वास्थ बिघडते आणि परिणामस्वरूप अनेक रोगांना बळी पडते. चक्कर येणे, डोळयासमोर अंधारी येणे, घबराहट होणे, उल्टी होणे, रक्तदाब वाढणे किंवा कमी होणे. ताप राहणे हे सर्व आजार फक्त वारंवार गर्भपात केल्यामुळे होतात.

वास्तविक पाहता गर्भपात हा सामाजिक व वैयक्तीक दृष्ट्या जितका तिरस्कारपद समजल्या जातो त्यापेक्षा अधिक पटीने स्त्रीच्या शारीरीक व मानसिक स्वास्थावर हानिकारक परिणाम होतो. कधी कधी गर्भपात होतांना जराशी चुक झाली तर मृत्यू होवू शकतो त्यालाच मातामृत्यू नाव दिल जाते.

अध्ययनानुसार कोणतीच माता आपल्या मुलाला गर्भपात करायला तयार नसते. आईला दोन्ही मुले मुलगी हो या मुलगा सारखेच प्रिय असतात. परंतु बदलत्या काळाची गरज आणि कुटूंबातील सद्स्यांची ईच्छा यामुळे गर्भपात करण्यासाठी ती मजबुर होते. आणि आपला दर्जा उंच ठेवण्याकरीता छोटे कुटूंब असावे या विचाराने देखील गर्भपात केला जातो. परंतु स्त्रीचे दुर्भाग्य असे की स्त्री लिंगाच्या गर्भपात करण्यासाठी सर्व तयार असतात. चुकीने मुलाचा गर्भपात झाला तर कुटूंबातील सर्व सदस्यांना त्याचे दुःख होते. मात्र स्त्रीभृणहत्या मात्र सर्वांच्या इच्छेने केली जाते.

**निष्कर्ष –**

मुलगी म्हणजे अबला, लग्नात तिला हुंडा द्यावा लागतो. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणीची काठी अशा अनेक भ्रामक कल्पना आपल्या मनात खोल रूजलेल्या आहेत. हुंडा देण्यासाठी, शिक्षणासाठी पैसा नाही, मुलीवर होणा–या अत्याचाराला सामना करण्याचे सामर्थ्य नाही या अनेक कारणामुळे मुलगी नकोच या दृष्टीने अनेक प्रकाराने स्त्री भ्रृण हत्येचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्रात स्त्रीच्या प्रमाणचा निर्देषांक उळमळीत होऊ लागला असे झाले तर भविष्यात मुलीच राहणार नाही व त्यामुळे येणा–या संकटाशी कल्पना सुन्न करणारी आहे, परंतु मानव वंश पुढे नेण्याकरीता मुलींची आवश्यकता आहे हे विसरता कामा नये. मुलीचे दराचे घटते प्रमाण त्याची कारणे, जबाबदार संस्था लक्षात घेता मुलींचे महत्व समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. एकंदरीत समाजाची मानसीकता बदलणे काळाची गरज आहे.

**संदर्भ सुची –**

1) प्रकाश नारायण नाटाणी –कन्या भ्रुणहत्या और महिलाओंके प्रति घरेलु हिंसा बुक एनक्लेव जयपूर – 2007
2) मंजु गुप्ता – सुभाष चंद्र गुप्ता –भ्रुणहत्या और महिलाये अर्जुन पब्लिशींग हाऊस, दिल्ली 2009
3) https//larakiyan wordpress com./ 17 May 2007
4) www.ngo-mary.org// - 2008
5) www.laughwithjay.com/award asp - 2008